# नियमीत दिवाणी दावा क्र.३३/२०२२ अर्ज नि.३३ खालील आदेश

(CNR-MHSI090001332022)

०१. सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.०१ ते ०२ यांनी त्यांची लेखी कैफीयत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन, त्यांची कैफीयत दाखल करून घेण्यासाठी विनंती केली आहे.

०२. वादीने प्रस्तुत अर्जास तीव्र आक्षेप नोंदविला. उभयपक्षांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. दाव्यातील सर्व कागदपत्रांची बारकाईने पाहणी केली. प्रतिवादी यांना, पुरेशी संधी देवुन देखील त्यांनी विहीत मुदतीत त्यांची लेखी कैफीयत दप्तरी दाखल केलेली नाही. प्रस्तुतचा दावा हा ठराव व ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरूप पाहता प्रतिवादी क्र.०१ ते ०२ यांना संधी देणे न्यायसंगत वाटते. जर तसे केले नाही तर त्यांच्या बचावाचे दरवाजे बंद होतील व सदरील दावा हा गुणावगुणावर निकाली लागणार नाही व त्यांच्या कायदेशीर अधिकारावर गदा येईल. तरी, न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी यांना बचावाची संधी देणे विधीसंगत वाटते. सदर प्रकरणातील वस्तुस्थिती व दाव्याचे स्वरूप पाहता, अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. परंतु, प्रतिवादी यांना संधी देतांना त्यांनी त्यांची लेखी कैफियत दाखल करण्यासाठी केलेल्या विलंबाच्या अनुषंगाने अर्ज खर्चासह मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. करिता, खालील आदेश.

:: **आदेश** ::

१. निशाणी क्र.३३ वरील अर्ज रु.३००/-(रूपये तीनशे फक्त) च्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यंत न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.01.19 11:15:07 +1000

दिनांक – १८/०१/२०२३

(सुनिल बा. वाळके)
दिवाणी न्यायाधिश, क स्तर,
देवगड.